महाराष्ट्र विधानसभा

पहिले अधिवेशन, २०१८

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मु.पो.कुड्जे (ता.हवेली, जि.पुणे) येथील ग्रामसेवकाने कुडजे गावात विनापरवाना बांधकामाच्या नोंदी केल्याबाबत

(१) १५९८० (०९-०४-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील खडकवासला मतदारासंघातील मु.पो.कुड्जे (ता.हवेली, जि.पुणे) येथील ग्रामसेवकाने कुडजे गावात विनापरवाना बांधकामाच्या नोंदी केल्या असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मु.पो.कुड्जे (ता.हवेली, जि.पुणे) येथील ग्रामपंचायतीतील सर्वत्र बांधकामाच्या नोंदी बंद असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन संबंधित ग्रामसेवकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२०-०१-२०१८) : (१) होय.

(२) नाही. ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात अधिकृत बांधकामांच्या म्हणजेच पूर्व परवानगी, अकृषिक परवाना आणि पुर्णत्वाचा दाखला प्राप्त असलेल्या बांधकामांच्या नोंदी करण्यात येत आहे.

(३) व (४) संबंधित ग्रामसेवक यांनी कर्तव्यात केलेल्या कसुरीबाबत त्यांचेवर कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांची एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न करता रोखण्याची कारवाई करण्यात आली आहे.

नांदेड सिटी बांधकाम प्रकल्पासाठी खडकवासला जलाशयातून अनधिकृत पाणीपुरवठा होत असल्याबाबत

(२) २९२३५ (१४-०१-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात अनधिकृतपणे शासन निर्णयाच्या विरुद्ध आउटलेट (स्ल्युइस वॉल्व्ह) मधून सलग पाण्याची लाईन जोडून नांदेड सिटी बांधकाम प्रकल्पासाठी खडकवासला जलाशयातून पाणीपुरवठा देण्यात आला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समर्थ पोलिस स्टेशन पुणे येथे बांधकाम व्यवसायिक व अधिक्षक अभियंता पुणे पाटबंधारे मंडळ पुणे यांचे विरुद्ध बनावट कागदपत्र तयार करुन खडकवासला धरणास (स्ल्युइस वॉल्व्ह) धोका निर्माण केल्याबाबत फौजदारी गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पानशेत धरणफूटी मागे हाच (स्ल्युइस वॉल्व्ह) ब्लॉक झाल्याने दुर्घटना झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २००९ मध्ये अधीक्षक अभियंता यांनी दिलेली परवानगी तात्काळ रद्द करून सदरचे स्ल्युइस वॉल्व्ह यास जोडण्यात आलेली पाइप लाइन काढून (स्ल्युइस वॉल्व्ह) मोकळे करण्यात येणार आहे, हे ही खरे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०७-०२-२०१८) : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) नांदेड सिटी विशेष नगरवसाहत प्रकल्पास खडकवासला धरणातील मुठा डाव्या कालव्याच्या आऊटलेटमधून पाणी वापरास दिलेली परवानगी विभागाने रद्द केली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील पाली-भुतिवली धरणाचे पाणी अनधिकृतपणे बिल्डर वापरत असल्याबाबत

(३) ३३५१५ (१५-०१-२०१६). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील पाली-भुतिवली धरणाचे पाणी शेतीला न देता १० वर्षापासून बिल्डर वापरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदुनसार सदर धरणाचे पाणी शेतीला न देता बिल्डरला देणाऱ्या अधिकाऱ्यावर व बिल्डरवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदर धरणाच्या पाण्याचा वापर शेतीला जास्त व्हावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. गिरीष महाजन (०७-०२-२०१८) : (१) हे खरे नाही.

पाली-भुतिवली धरणाच्या मंजूर प्रकल्प अहवालातील बिगर सिंचन पाणी वापराच्या कोट्यातून ६ वर्षासाठी (डिसेंबर २०१० ते डिसेंबर २०१६) मे. पोद्दार डेव्हलपर्स यांना घरगुती पाणी वापरासाठी आरक्षणानुसार पाणी पुरवठा करण्यात येत होता. सध्या संबंधित पाणीवापर संस्थेचा करारनामा संपुष्टात आल्यामुळे पाणी आरक्षण प्रस्तावास महामंडळ कार्यालयाने दि.०२/११/२०१७ अन्वये मंजूरी प्रदान केली असून प्रदेश कार्यालयाने दि.१५/११/२०१७ अन्वये इरादा पत्र प्रदान केले आहे. याबाबत संबंधित अभिकरणासमवेत करारनामा करणेची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) पाली - भुतिवली धरणास डावा कालवा ७ कि.मी. व उजवा कालवा ८ कि.मी. लांबीचा असून या दोन्ही कालव्याद्वारे एकूण १७५८ हेक्टर क्षेत्र (पीक क्षेत्र) सिंचनाखाली येणार आहे. उजव्या कालव्याचे ३.७५ कि.मी. व डाव्या कालव्याचे ०.८० कि.मी. पर्यंतचे काम पूर्ण झाले आहे. कालव्याच्या उर्वरित कामास भूसंपादन प्रक्रियेस स्थानिक शेतकऱ्यांचा तीव्र विरोध आहे. तसेच मूळ भूसंपादन प्रस्ताव व्यपगत झाले असून नवीन भूसंपादन कायद्यानुसार भूसंपादन कार्यवाही क्षेत्रियस्तरावर प्रगतीत आहे. कालव्याची उर्वरित कामे बंदिस्त पाईपलाईनव्दारे प्रस्तावित असून भूसंपादन कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर व निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्प कालव्यासह पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

चांदूर रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यात अतिवृष्टीने खचलेल्या विहिरींचे नुकसानीचे अनुदान शेतकऱ्यांना देण्याबाबत

(४) ४७०१७ (२८-०४-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूर रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यात सन २०११-१२ मध्ये अतिवृष्टीने विहिरी खचल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याने या विहीरींच्या नुकसानीचे पंचायत विभागाद्वारे सर्वेक्षण करुन शासनाने त्वरीत अनुदान देण्याचा निर्णय घेतला होता मात्र हे अनुदान प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांचे प्रलंबित अनुदान त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल (२५-०१-२०१८) : (१) हे खरे नाही.

सन २०११-१२ मध्ये अतिवृष्टीने खचलेल्या किंवा बुजलेल्या विहीरींना झालेल्या नुकसानीचे अनुदान देण्याबाबत शासन निर्णय नाही. तथापि, नियोजन विभागाचे पत्र दि.२३ मे, २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार सन २०१३ च्या झालेल्या अतिवृष्टीमुळे ज्या विहीरी

खचल्या किंवा बुजल्यामुळे क्षतिग्रस्त झाल्यात त्या करिता मग्रारोहयो अंतर्गत १ लक्ष ५० हजार रुपये पर्यंत अनुदान देऊन बांधकाम करण्याची तरतुद करण्यात आलेली आहे.
(२) शासन निर्णय दि.२० जुलै, २०१५ अन्वये जिल्हाधिकारी यांनी अतिवृष्टी झाल्याचे घोषीत केलेल्या क्षेत्रामध्ये खचलेल्या विहीरींच्या दुरुस्तीची कामे मग्रारोहयो अंतर्गत अनुज्ञेय आहे. त्यानुसार तहसिल कार्यालय, चांदूर रेल्वे कडून १००९ शेतक-यांचे पंचनामे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चांदूर रेल्वे यांच्याकडे पाठविण्यात आले आहे. त्यापैकी ग्रामपंचातयीकडून ४०० प्रस्ताव कागदपत्रासह पंचायत समितीला प्राप्त झाले असून, त्यापैकी २१२ खचलेल्या विहीरींचे प्रस्ताव मग्रारोहयो अंतर्गत पात्र ठरलेली आहेत. त्यापैकी तहसिल कार्यालयाने २२ व पंचायत समिती कार्यालयाने १९० अशा एकूण २१२ खचलेल्या विहीरींच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यापैकी १३ विहीरी पूर्ण झाल्या असून, ७८ विहीरींची कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित विहीरींची कामे सुरु करण्यासंबंधात पंचायत समिती स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

माणगाव (जि.सातारा) तालुक्यात किरकसाल मधून माणगांववासीयांना पाणी सोडण्याबाबत

(५) ५१००७ (२९-०४-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्हयातील माणगाव तालुक्यात किरकसाल मधून पाणी सोडण्यात आले असतांना येथील शेतीला उभारी मिळणार असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर माणगांववासीय जनतेला नियमित पाणी सोडण्याबाबत शासनाने कोणते नियोजन केले आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०७-०२-२०१८) :(१) होय.
(२) उरमोडी उपसा सिंचन योजने अंतर्गत माण तालुक्यात पाणी देण्यासाठी ३१ कि.मी. लांबीच्या माण कालव्याचे कि.मी. क्र. १ ते ५ चे काम पूर्ण झाले असून त्यामधून माण कालव्यात पाणी सोडण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील बागायती शेतकऱ्यांना शेततळ्यांसाठी अनुदान मिळण्याबाबत

(६) ५१९७४ (२९-०४-२०१६). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील अनेक बागायती गावांमधील शेततळ्यांसाठी शासनाने अनुदान द्यावे अशी मागणी तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांकडून आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किती शेतकऱ्याकडून शेततळी मिळण्याबाबतची मागणी करण्यात आलेली आहे,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या संदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय,
(४) असल्यास, केव्हा निर्णय घेण्यात आला आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल (२३-०१-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.
(२) मागेल त्याला शेततळे - ४२ शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज सादर केले होते.
राष्ट्रीय फलोत्पादन अभियान - ३१ प्रस्ताव
जलयुक्त शिवार अभियान - ४६ प्रस्ताव
राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - १४ प्रस्ताव
(३) होय.
(४) मागेल त्याला शेततळे योजनेअंतर्गत सन २०१६-१७ मध्ये ११ पात्र लाभार्थ्यांपैकी ७ लाभार्थ्यांनी काम सुरु करण्यात लेखी नकार दिला. उर्वरित ४ कामे पूर्ण करण्यात आली.
राष्ट्रीय फलोत्पादन अभियान - सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात १० प्रस्ताव मंजूर करण्यात आले असून ती कामे प्रगती पथावर आहेत.
जलयुक्त शिवार अभियान - सन २०१६-१७ मध्ये ४६ प्रस्तावांना जिल्हाधिकारी यांनी मंजूरी दिली आहे. त्यापैकी ९ शेततळे पूर्ण करण्यात आली आहेत.
राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - सन २०१६-१७ मध्ये एकूण १४ शेततळ्यांचे प्रस्ताव कृषी अधिकारी, पुणे यांनी मंजूरीसाठी सादर केले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील विविध गावांत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कामे न करता गैरव्यवहार केल्याबाबत

(७) ५७६१४ (१०-०८-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील विविध गावांत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत सन २०११-१२ व कायद्याच्या नियमाप्रमाणे कामे न करता योजनेच्या कामात मोठ्या प्रमाणात अनियमितता करुन गटविकास अधिकारी व ग्रामसेवक यांनी संगनमत करुन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याची तक्रार विभागीय आयुक्त यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारीनुसार चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार गटविकास अधिकारी व ग्रामसेवक यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल (१२-०२-२०१८) : (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी तत्कालीन गटविकास अधिकारी यांचे विरुध्द विभागीय चौकशी अधिकारी, औरंगाबाद यांचेस्तरावर चौकशी सुरु आहे.

त्याचप्रमाणे सदर प्रकरणे अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या ३ ग्रामसेवकांची एक वार्षिक वेतनवाढ बंद करण्यात आली आहे. तसेच अन्य ११ ग्रामसेवकांच्या विरुध्द चौकशीची प्रक्रिया विविध टप्यांवर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विकसीत, विकसनशील व अविकसित अशा नागरी व ग्रामीण भागातील नागरिकांकडून वसुल करण्यात येत असलेल्या विक्री कराबाबत

(८) ६५६०८ (२७-०१-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषतः विकसित विकसनशील व अविकसित अशा नागरी व ग्रामीण भागातील नागरिकांकडून सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात विक्री कराद्वारे जवळपास एक लक्ष कोटी रुपये विक्री करातून वसूल करण्याबाबतची योजना राज्यातील सर्वसामान्य नागरिक, ग्राहकांनी तसेच उपभोक्ता यासह स्थानिक करदाता नागरिक व त्यांच्या सेवाभावी संस्था, लोकप्रतिनिधी तसेच आसपासच्या क्षेत्रातील रहिवाशी व व्यापारी संघटना यांच्यावतीने मा.मुख्यमंत्री, मा.वित्त व नियोजन मंत्री, मा.राज्यमंत्री वित्त व नियोजन, अतिरिक्त मुख्यसचिव, वित्त व नियोजन तसेच संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि संबंधित वित्तीय व्यवस्थापन अधिकारी वा इतर तत्सम अधिकाऱ्यांकडे दिनांक २ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखीनिवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वित्त व नियोजन विभागाच्यावतीने तसेच लोकप्रतिनिधी व जागृत करदाते, नागरिकांच्या संघटनेने सदर बाब वेळोवेळी राज्य विक्री कर आयुक्तालयाच्या निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(४) असल्यास,त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०१-२०१८) : (१) या बाबत मा.मुख्यमंत्री, मा.वित्त व नियोजन मंत्री, मा.वित्त व नियोजन राज्यमंत्री, अतिरिक्त मुख्य सचिव (वित्त व नियोजन) तसेच इतर अधिकारी यांच्या कार्यालयात सदरचे लेखी निवेदन प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) लागू नाही.
(३) लागू नाही.
(४) लागू नाही.
(५) लागू नाही.

पंचायत समिती चिमुर (जि.चंद्रपूर) येथील ग्रामपंचायत चिंचाळा शास्त्रीमधील रोहयो कामातील पांदण रस्त्याच्या कामात झालेला गैरव्यवहार

(९) ६६८३५ (२७-०१-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती चिमुर (जि.चंद्रपूर) येथील ग्रामपंचायत चिंचाळा शास्त्री मधील रोहयो कामातील पांदण रस्त्याच्या माती व मुरुम कामात गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्याबाबत चिंचाळा शास्त्रीचे सामाजिक कार्यकर्ते यांनी मुख्य कार्यपालन अधिकारी, चंद्रपूर यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तद्नुसार गैरव्यवहारातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल (०८-०२-२०१८) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी जिल्हास्तरावरुन चौकशी समितीमार्फत चौकशी करण्यात आली असून गौण खनिजाचा वाहतुक परवाना प्राप्त होण्यापूर्वीच साहित्याचा पुरवठा करण्यात आलेला आहे. त्यामुळे संपूर्ण साहित्याची रॉयल्टीची रक्कम दंडासह वसूलीस पात्र आहे. त्यानुसार पुरवठादार श्री.प्रविण मोतीराम वाघे यांच्याकडून दंडाची रक्कम रु.१५,५५,२५५/- वसुल करण्यासाठी नमुना-१ ची नोटीस तहसिलदार, चिमूर यांचेमार्फत काढण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सावनेर (जि.नागपूर) तालुक्यात दलित वस्ती विकासनिधीचा दुरुपयोग केल्याबाबत

(१०) ७३९२९ (१४-०४-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील दलित वस्तीत माहे जानेवारी, २०१७ च्या निधीतंर्गत ओबीसी प्रभागात रस्ता व नालीचे बांधकाम केले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामसेवक यांच्यावर ॲट्रॉसिटीज कायद्यातंर्गत गुन्हे दाखल करण्यासाठी गट ग्रामपंचायत सदस्य यांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दलित वस्ती विकासनिधीचा दुरूपयोगासंदर्भात शासनाने वेळोवेळी काढलेल्या परिपत्रकांवर जिल्हा परिषद अधिकारी अंमलबजावणी करीत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार दोषीं अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२०-०१-२०१८) : (१) अशंत: खरे आहे. संबंधीत गावात सन २०१४-१५ मध्ये सिमेंट नाली व रस्ता बांधकामाची कामे मंजूर करण्यात आली होती ती कामे सन २०१६-१७ मध्ये पूर्ण झाली.
(२) अशी मागणी केलेली नाही.
(३) दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत तरतुदीनुसार ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या दलित वस्तीतील प्रभागाकरिता विकास निधीची मागणी केल्यानुसार विकास निधी मंजूर करण्यात येतो. त्यामुळे ग्रामपंचायती अंतर्गत ज्या दलित वस्ती प्रभागाकरिता विकास निधी मंजूर करण्यात आलेला आहे. त्याच प्रभागात विकास निधी खर्च करण्यात येत असल्याने अनुसूचित जाती व नवबौध्द घटकाच्या वस्तीचा विकास करणे या योजनेतील तरतुदीनुसार जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर योजनेची अंमलबजावणी करण्यात येते.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यात पाटबंधाऱ्याच्या पाणी परवान्यासाठी पैश्यांची मागणी होत असल्याबाबत

(११) ७६२६८ (२०-०४-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अजित पवार (बारामती) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यात पाटबंधारे विभागाच्या पाणी परवान्यासाठी अधिकारी व कर्मचारी पैश्यांची मागणी करीत असल्याची घटना माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, तद्नुसार पाटबंधारे पाणी परवाना अधिकारी व कर्मचारी यांनी पैसे न घेता परवाना देण्यासह पाणी परवान्यासाठी पैश्यांची मागणी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०७-०२-२०१८) : (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नदीजोड प्रकल्पांतर्गत ९० टक्के कामे पूर्ण होऊन निधी अभावी १० टक्के कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(१२) ७७३८९ (१५-०४-२०१७). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तापी पाटबंधारे विकास महामंडळाअंतर्गत नदीजोड प्रकल्पांतर्गत नदीजोड योजनाच्या पहिल्या टप्प्यातील २८ योजनांच्या कामासाठी रु.२४३८.५९ लक्ष किंमतीच्या योजनांच्या अंदाजपत्रकांना जिल्हा नियोजन समिती, जळगांव यांनी प्रशासकीय मान्यता दिली असून सदर प्रकल्पांतंर्गत ९० टक्के कामे पूर्ण होऊन निधी अभावी १० टक्के कामे अपूर्णावस्थेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.पालकमंत्री व मा.जलसंपदा मंत्री यांनी तात्काळ निधी वितरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी जळगांव यांना देऊनही आतापर्यंत सदर आदेशाची अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर प्रकल्पासाठी निधी वितरीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२२-०१-२०१८) : (१) नदी जोड प्रकल्प जिल्हा नियोजनातून साकारला जात आहे. नदी जोड प्रकल्पास जिल्हा नियोजन समितीने प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पाचे काम लघु पाटबंधारे विभाग, जळगावमार्फत ठेव तत्वावर सुरु आहे. या विभागाकडून प्राप्त माहितीनुसार रु. २४३८.५९ लक्ष किंमतीच्या प्रशासकीय मान्यतेपैकी मार्च, २०१७ अखेर रु. १७८७.२६ लक्ष खर्च झाला आहे.

(२) होय.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सदरहू नदीजोड प्रकल्पासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार नदीजोड प्रकल्पासाठी निधी उपलब्ध होण्याकरीता जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत समाविष्ट करण्याबाबत दिनांक २३.०८.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

लासलगाव (ता.निफाड, जि.नाशिक) या गावामध्ये जिल्हा वार्षिक योजनेतून विकास कामे मंजूर करणेबाबत

(१३) ७८९८४ (२५-०४-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमदार आदर्श ग्राम योजनेंतर्गत निवडलेल्या लासलगाव (ता.निफाड, जि.नाशिक) या गावामध्ये जिल्हा वार्षिक योजनेतील नाविन्यपूर्ण योजनेतून अभ्यासिका आणि यात्रास्थळ विकासासाठी अनुदानातून येथील 'क' वर्ग यात्रास्थळाला वाहनतळ करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हा प्रशासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकास कामांसाठी जिल्हा प्रशासनाने माहे जानेवारी, २०१७ पर्यंत प्रशासकीय मान्यता व अनुदान दिलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार आमदार आदर्श ग्राम योजनेतील गावामध्ये विकास कामांना निधी वितरीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०८-०२-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) आमदार आदर्श ग्राम योजनेच्या आराखड्यातील विकास कामांना जिल्हा नियोजन समितीच्या निकषानुसार विविध योजनेत समाविष्ट करून त्यांना प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) अशी बाब नाही.

नांदेड जिल्ह्यातील, पंचायत समिती, मुखेडतंर्गत वैयक्तीक लाभार्थ्यांच्या नावे असलेल्या शौचालयाच्या बांधकाम निधीत झालेला अपहार

(१४) ७९८४० (१९-०४-२०१७). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील पंचायत समिती, मुखेड अंतर्गत वैयक्तीक लाभार्थ्यांच्या नावे असलेल्या शौचालय बांधकामे न करताच ग्रामसेवकांनी लाभार्थ्यांची ग्रामपंचायत प्राप्त रक्कम परस्पर घेवून अपहार केल्या प्रकरणी गटविकास अधिकारी व ग्रामसेवकांची चौकशी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व चौकशीनुसार गटविकास अधिकारी व ग्रामसेवकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२०-०१-२०१८) : (१) होय.

(२) नांदेड जिल्ह्यातील पंचायत समिती, मौजे.बैटमोगरा, ता. मुखेड येथील निर्मल भारत अभियान, स्वच्छ भारत मिशन व महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना अंतर्गत तत्कालीन ग्रामसेवक श्री. येन्डे यु. जी यांनी प्राप्त रक्कमेत अपहार केला असल्याचे आढळून आले आहे

श्री. येन्डे यु. जी. तत्कालीन ग्रामसेवक यांना निलंबित करण्यात आलेले असून मुखेड पोलीस स्टेशन मध्ये दि. ०३.०४.२०१७ रोजी अधिनियम प्रमाणे कलम ४०९ व ४२० अन्वये रितसर गुन्हा दाखल करण्यात आला आहे व त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सिंदेवाही पंचायत समिती अंतर्गत (जि.चंद्रपूर) येत असलेल्या वानेरी ग्रामपंचायत मधील ग्रामसेवकानी निधीचा केलेला अपहार

(१५) ८००११ (१८-०४-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदेवाही पंचायत समिती अंतर्गत (जि.चंद्रपूर) येत असलेल्या वानेरी ग्रामपंचायत मधील ग्रामसेवक यांनी १४ व्या वित्त्त आयोगाची ४० हजार रुपये सरपंचास विश्वासात न घेता बनावट स्वाक्षरीने निधीचा अपहार केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार निधीचा अपहार करणाऱ्या ग्रामसेवकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२०-०१-२०१८) : (१) होय.

चौदाव्या वित्त आयोगातील रू. ४५,०००/ इतकी रक्कम तात्पुरत्या स्वरूपात उसनवार घेऊन सामान्य फंड तथा पाणी पुरवठा या बाबींवरील किरकोळ खर्च भागविण्यात यावा असा ठराव दि. २७.९.२०१६ रोजी ग्राम पंचायत वानेरी च्या सर्वसाधारण सभेत झाला होता. त्यानुसार दि. २८.२.२०१६ रोजी श्री. आर. एन. कांबळे यांनी सरपंचाची स्वाक्षरी धनादेशावर घेऊन रू. ४०,०००/- इतकी रक्कम चौदाव्या वित्त आयोगाच्या फंडातून काढली व ती दि. २२.१.२०१७ पर्यंत स्वत:जवळ बाळगून दि. २२.१.२०१७ रोजी पुनश्च खात्यात भरली.

(२) व (३) श्री. आर.एन. कांबळे, ग्राम सेवक हे महाराष्ट्र जिल्हा परिषद (शिस्त व अपिल) नियम १९६४ च्या तरतूदीनुसार शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरत असल्याचा अहवाल गट विकास अधिकारी (पंचायत समिती सिंदेवाही) यांच्याकडून प्राप्त झालेला आहे. या अहवालाच्या अनुषंगाने श्री. आर. एन. कांबळे, यांना दि. २५.०४.२०१७ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. या नोटीशीस अनुसरून श्री. कांबळे यांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर त्यांच्याविरूध्द प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

आमदार आदर्श गाव योजनेंतर्गत सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(१६) ८०९१० (२०-०४-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने आमदार आदर्श गाव योजना माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यात सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी प्रत्येक आमदारांनी गांवे निवडून ती जिल्हा नियोजन शाखेकडे दिली असून यासाठी शासनाने अद्यापपर्यंत निधी उपलब्ध करुन दिला नसल्याने या गावांत कोणतीही कामे झाली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०८-०२-२०१८) : (१) होय.

(२) नाही.

आमदार आदर्श ग्राम योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यात एकूण १४ विधान मंडळ सदस्यांपैकी १२ विधान मंडळ सदस्यांनी गावाची निवड कळवलेली असून १२ गावांना ग्रामविकास आराखडा तयार करणे कामी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे निधी वर्ग करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात ३७६ सिंचन प्रकल्प बांधकामाधीन असून या प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यासाठी निधी मिळण्याबाबत

(१७) ८१३२९ (१७-०४-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ३७६ सिंचन प्रकल्प बांधकामाधीन असून या प्रकल्पांची कामे पूर्ण होण्यासाठी साधारणत: ८४ हजार ४३० कोटी रुपये इतकी रक्कम लागणार आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हे व कायम दुष्काळग्रस्त भागातील प्रलंबित सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सुमारे १० हजार ६८७ कोटी रुपयांची आवश्यकता असून केंद्र शासनाकडे दहा हजार कोटीच्या पॅकेजची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त पॅकेजनुसार निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०७-०२-२०१८) : (१) होय.
(२) होय.
(३) केंद्र शासनास आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील व अवर्षणप्रवण जिल्ह्यातील अपुर्ण प्रकल्प पुर्ण करण्यासाठी रु.१०,६८७ कोटी निधी मिळणेबाबत विनंती करण्यात आली आहे. याबाबत पाठपुरावा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली जिल्ह्यातील ताकारी सिंचन योजनेची कालवा सल्लागार समितीची बैठक झाली नसल्याबाबत

(१८) ८१६२२ (२०-०४-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कडेगांव, खानापूर आणि तासगांव (जि.सांगली) तालुक्यातील ताकारी योजनेच्या कालवा सल्लागार समितीची बैठक गेल्या वर्षभरापासून झाली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेची कामे निधी अभावी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त सल्लागार समितीची बैठक न होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०१-०२-२०१८) : (१) नाही,

ताकारी योजना ही कृष्णा कोयना उपसा सिंचन योजनेचा भाग असून कृष्णा कोयना उपसा सिंचन योजनेच्या रब्बी हंगामासाठी मा.अध्यक्ष तथा मंत्री वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र यांचे अध्यक्षतेखाली व लाभक्षेत्रातील लोकप्रतिनिधी सदस्य असलेल्या कालवा सल्लागार समितीची बैठक दि.९.१.२०१७ रोजी मंत्रालय मुंबई येथे संपन्न झाली आहे.
(२) नाही.

कृष्णा कोयना उपसा सिंचन योजनेचा समावेश प्रधान मंत्री कृषी सिंचन योजनेमध्ये असून नियोजनाप्रमाणे कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या दोन मजुरांना फरकाची रक्कम अदा केल्याबाबत

(१९) ८२९५० (१७-०४-२०१७). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अकोला उपविभागातील दोन मजुरांना हजेरीपत्रकावर घेत त्यांना फरकाची रक्कम २४ लाख रुपये अदा करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या देयकासाठी शासनाची मंजुरी आवश्यक असतानाही ती न घेता ही देयके काढण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधीत दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२४-०१-२०१८) : (१) नाही.

(२) हे खरे नाही.

(३) चौकशीची आवश्यकता नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

आंबेगाव व शिरुर (जि.पुणे) तालुक्यातील जास्त पाणी असलेल्या बंधाऱ्याचे पाणी कोरड्या बंधाऱ्यात सोडण्याबाबत

(२०) ८३१४१ (१८-०४-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगाव व शिरुर (जि.पुणे) तालुक्यातील काही बंधाऱ्यात भरपूर पाणी तर काही बंधारे कोरडे पडले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंधाऱ्यात पाणी उपलब्ध आहे ते कोरडया बंधाऱ्यात सोडून देण्याचे नियोजन करणे महत्वाचे असतानाही जलसंपदा विभाग दुर्लक्ष करीत असल्याने हजारो हेक्टर क्षेत्रावरील पिके पाण्याअभावी करपून जाण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन येथील पिके वाचविण्यासाठी डिंभे धरण येथून घोडनदीत पाणी सोडावे किंवा ज्या बंधाऱ्यात पाणी आहे तेथील पाणी इतर बंधाऱ्यात सोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०६-०२-२०१८) : (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्हा परिषद शाळांतील प्राथमिक शिक्षकांच्या बदल्यांचे नवे धोरण निश्चित करण्याबाबत

(२१) ८४०२७ (२०-०४-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हा परिषद शाळांतील प्राथमिक शिक्षकांच्या बदल्यांचे नवे धोरण निश्चित करण्याचा निर्णय शासनाच्या ग्रामविकास विभागाने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, नविन धोरण निश्चित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२९-०१-२०१८) : (१) राज्यातील सर्व जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्या करण्याबाबत शासन निर्णय क्र. जिपब४८१७/प्र.क्र.७/आ.१४, दिनांक २७.०२.२०१७ अन्वये नवीन सुधारित धोरण जाहिर केले आहे.
(२) व (३) तीन वर्षे अवघड क्षेत्रात काम केलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांना बदली अधिकार प्राप्त होणे, सर्व शाळा मध्ये शिक्षकांची समान रिक्त पदे ठेवणे व विशेष संवर्ग भाग १ मधील शिक्षकांना त्यांच्या विनंतीनुसार बदली देणे इत्यादी बाबी या शासन निर्णयात समाविष्ट आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

बुलढाणा जिल्ह्यातील निवृत्तीधारकांना नियमित निवृत्ती वेतनाचा लाभ देण्याबाबत

(२२) ८५०९९ (११-०८-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील वित्त विभाग, जिल्हा परिषद यांच्याकडून होणाऱ्या दिरंगाईमुळे तसेच हयातीचे प्रमाणपत्र सादर करूनही निवृत्ती वेतनधारकांना त्यांना मिळणाऱ्या लाभापासून वंचित रहावे लागत असल्याची बाब दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यातील निवृत्तीधारकांना नियमित निवृत्ती वेतनाचा लाभ देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२०-०१-२०१८) : (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील आंबीत धरणाची दुरुस्ती करण्याबाबत

(२३) ८७८५५ (१२-०८-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील आंबीत धरण परिसरात अतिवृष्टी झाल्याने धरणाच्या जवळ "माची" डोंगराला १६ कि.मी. लांबीच्या मोठमोठ्या भेगा पडल्यामुळे धरणाच्या दगडी भिंतीजवळ जलक्षोभनाशक कुंडाला हानी पोहचली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच स्थानिक जनतेनी मा.जलसंपदा मंत्री, कार्यकारी अभियंता, पाटबंधारे अहमदनगर यांना सहा महिन्यांपूर्वी लेखी निवेदन दिले परंतु यावर कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार धरणाची दुरुस्ती करण्यासह भूस्खलन टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०३-०२-२०१८) : (१) नाही. तथापि सन २००६ ते २००८ या कालावधीतील पुरामुळे जलक्षोमनाशक कुंडातील ६० पैकी ३७ पॅनेल्सला हानी पोहचली आहे.
(२) असे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी त्यांच्या दि.७.१२.२०१६ च्या पत्रान्वये मा.मंत्री, जलसंधारण, यांना सादर केले होते. याबाबत तातडीने उचित कार्यवाही करण्याच्या सूचना शासन स्तरावरुन कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना दि.११.४.२०१७ च्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.
(३) सन २०१६ मध्ये झालेल्या भूस्खलनामुळे धरणास हानी पोहचली नसल्याने दुरुस्ती करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि जलक्षोमनाशक कुंडाची आवश्यक दुरुस्ती करुन घेण्याबाबत क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

भंडारदरा (जि.अहमदनगर) धरणावर उभारण्यात आलेल्या जलविद्युत प्रकल्पाला आवश्यक असलेले पाणी सोडण्यासाठी नियुक्त केलेली समिती स्थगित करण्याबाबत

(२४) ८७८५९ (१८-०८-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारदरा (जि.अहमदनगर) धरणावर उभारण्यात आलेल्या जलविद्युत प्रकल्पाला आवश्यक असलेले पाणी सोडण्यासाठी नव्याने नियुक्त करण्यात आलेली समिती स्थगित करुन सदर अधिकार मा.जलसंपदा मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली कालवा सल्लागार समितीकडेच कायम ठेवावे अशी मागणी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०७-०२-२०१८) : (१) होय.

(२) भंडारदरा जलविद्युत केंद्रातून वीजनिर्मिती होण्यासाठी विद्युतगृहातून पाणी सोडण्याचे नियोजनासंदर्भात कायमस्वरुपी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने दि.१६.३.२०१७ च्या शासन निर्णयान्वये समन्वय समिती गठित केलेली आहे.

पाण्याचा वापर काटकसरीने व इष्टतम करण्यासाठी सिंचन प्रकल्पाचे वार्षिक पाणी नियोजन कालवे सल्लागार समितीची कार्यकक्षा आहे. तर कालवे सल्लागार समितीने केलेले नियोजन अबाधित ठेऊन सिंचनासाठी आवश्यक पाणी सोडतेवेळी इष्टतम वीजनिर्मिती होण्यासाठी पाणी आवर्तन, कार्यक्रमाची आखणी व त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करणे समन्वय समितीची कार्यकक्षा आहे. या दोन्ही समित्यांची कार्यकक्षा वेगवेगळी असल्याने समन्वय समिती स्थगित करणे योग्य होणार नसल्याचे श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, विरोधी पक्षनेता यांना दि.१३.६.२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अंजनसिंगी कौडण्यपूर (ता.तिवसा, जि.अमरावती) रस्त्यावरील पुलाच्या बांधकामास परवानगी देणेबाबत

(२५) ८८०७२ (१२-०८-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनसिंगी कौडण्यपूर (ता.तिवसा, जि.अमरावती) रस्त्यावरील कि.मी. ४/४८० मधील भीलदोरी उंच पूलाच्या उर्वरित बांधकाम निधीतून त्याच रस्त्यावरील ३/४०० मधील पुलाचे बांधकामास परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ ऑगस्ट, २०१६ रोजी मा.जलसंधारण मंत्री यांच्याकडे दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०७-०२-२०१८) : (१) स्थानिक लोकप्रतिनिधीनी सदर पुलाचे बांधकामाचे खर्चाची परवानगी देण्याबाबतची मागणी मुख्य अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प, जलसंपदा विभाग, नागपूर यांचेकडे दि.१९/०८/२०१६ चे पत्रान्वये केली आहे.
(२) अंजनसिंगी-कौंडण्यपूर रस्त्यावरील कि.मी.३/४०० येथील पूलाचे अनुषंगाने क्षेत्रिय कार्यालयाकडून स्थळ पाहणी केली असता रस्त्यास छेदणारा नाला हा धारवाडा पुनर्वसनाचे जागेच्या लगत असून सदर क्षेत्र निम्न वर्धा प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रात येत नाही. तसेच या नाल्यावरील छोटा पूल सद्य:स्थितीत चांगल्या स्थितीत आहे.
सदर नाला व रस्त्यावरील पुलाचे क्षेत्र निम्न वर्धा प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रात येत नसल्याने तसेच कौंडण्यपुर रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असल्याने अंजनसिंगी - कौंडण्यपुर रस्त्यावरील कि.मी. ३/४०० या ठिकाणी पूल बांधण्याचे काम निम्न वर्धा प्रकल्पांतर्गत भिलदोरी उंच पुलाच्या बांधकामाच्या बचत निधीमधून करता येणार नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही

शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील साठगांव ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकानी केलेला गैरकारभार

(२६) ९१५१६ (२२-०८-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील साठगांव ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांच्या मनमानी व गैरकारभाराबाबत त्यांना निलंबित करण्याची मागणी तेथील सरपंच, उपसरपंच व महिला सदस्यांनी दिनांक १६ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास कोकण विभागीय आयुक्तांकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, साठगांव व रानविहिर ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक कार्यालयात हजर न राहणे, वेळेवर ग्रामसभा, मासिक सभा, विकासकामे न करता पंचायत समितीच्या बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंत्यांशी संगनमत करणे, शौचालय लाभार्थ्यांना अनुदान देताना ऑनलाईन यादी न पाहता अपात्र उमेदवारांना लाभ देणे, घरकुल लाभार्थी यादीत फेरबदल करुन शासनाच्या लाखो रुपयांचा गैरव्यवहार करीत असल्याने त्यांची चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार राज्यातील आधार केंद्रे तात्काळ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२०-०१-२०१८) : (१) होय, दि ३१ मे, २०१७ च्या तक्रार अर्जान्वये सदर मागणी गट विकास अधिकारी पंचायत समिती, शहापूर यांचेकडे करण्यात आली होती.
(२) साठगांव ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांचेकडे रानविहिर ग्रामपंचायतीचा अतिरिक्त कार्यभार असल्याने, तसेच स्वच्छ भारत मिशन अंतर्गत रानविहिर ग्रामपंचायतीला मार्च अखेर २६८ शौचालये बांधण्याचे उद्दीष्ट पुर्ण करण्यासाठी त्यांनी रानविहिर ग्रामपंचायतीमध्ये कामकाज केल्यामुळे त्यांना ग्रामपंचायत साठवण येथे कामकाजासाठी पुर्ण वेळ देता आला नाही. तथापि या कालावधीत साठगांव ग्रामस्थांना दाखले, उतारे देण्यात आलेले आहेत.
(३) होय, उक्त प्रकरणी गट विकास अधिकारी यांनी सखोल चौकशी केली असून तक्रारीत तथ्य आढळून आले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्हयातील खडकवासला साखळीतील धरणे, तलाव, मुठा कालवा येथे जलरक्षक नेमण्याबाबत

(२७) ९१७०९ (२१-०८-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील खडकवासला साखळीतील धरणे, तलाव, मुठा कालवा येथील पाण्यात पोहताना अनेक पर्यटकांचे बुडून मृत्यू होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार सदर ठिकाणी पर्यटकांच्या सुरक्षेसाठी जलरक्षक नेमण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०१-०२-२०१८) : (१) अनेक पर्यटकांचे बुडून मृत्यु होत आहेत अशी वस्तुस्थिती नाही.वर्ष २०१० मध्ये पानशेत जलाशयात बोट दुर्घटनेमध्ये दोन व्यक्तींचा व वर्ष २०१६ मध्ये नविन मुठा उजव्या कालव्यात बुडल्याने एका व्यक्तीचा मृत्यु झाला होता.
(२) धरण क्षेत्र व कालव्याचा भाग हे प्रतिबंधित क्षेत्र आहे.तसेच कालव्यात पाणी सोडण्यापूर्वी आवश्यक उपाययोजना करण्यात येते व संबधित यंत्रणेला उदा.महसूल, पोलिस, स्थानिक स्वराज्य संस्था इ.याबाबत सूचना देण्यात येतात तरी देखील सदर सूचनांकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते.
(३) धरण सुरक्षिततेच्या दृष्टीने धरणांवर नागरिकांना/पर्यटकांना प्रतिबंध करणे,धरणाची निगा राखणे इ.कामासाठी जलसंपदा विभागामार्फत कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते.

धरण परिसर व कालव्याच्या पूर्ण लांबीमध्ये ठिकठिकाणी पाण्यात पोहण्यास मनाई असल्याचे फलक लावण्यात आले आहेत, तसेच कालव्यातून पाणी सोडल्यानंतर पाणी आवर्तन काळादरम्यान फिरता कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात येतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

भाटघर, निरा-देवघर व वीर (ता.भोर, जि.पुणे) धरणांतील पाणीसाठा संपुष्टात आल्याबाबत

(२८) ९१७१३ (२१-०८-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाटघर, निरा-देवघर व वीर (ता.भोर, जि.पुणे) धरणातून चूकीचे नियोजन करुन आषाढी वारीसाठी दोन वेळा पाणी सोडल्यामुळे सदर धरणांतील पाणीसाठा मोठ्या प्रमाणावर संपुष्टात आला असल्याचे माहे जून, २०१० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणात गाळ मिश्रीत पाणी राहिल्याने येथील ग्रामस्थांना गाळमिश्रीत पाणी प्यावे लागत असून त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन सदर पाणी वाटपात चूकीचे नियोजन करणा-या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०६-०२-२०१८) : (१) नाही.

(२) नाही.

उपरोक्त धरणात पिण्यासाठी आवश्यक पाणीसाठा राखीव ठेवून पालखीकरीता पाणी सोडण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भडगांव (जि.जळगांव) येथील वन जमिनीची मालमत्ता मूल्य (एनपीव्ही) रक्कम भरण्याबाबत

(२९) ९१९८३ (१२-०८-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोजगार हमी योजनेंतर्गत पाझर तलाव जुवार्डी क्र.३, भडगांव (जि.जळगांव) १३.०० हेक्टर्स वन जमिनीच्या मालमत्ता मूल्य (एनपीव्ही) रक्कम भरणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री, यांना दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या निवेदनानुसार सदर प्रकरणी सचिव, जलसंधारण विभाग यांना प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल (०९-०२-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर काम अत्यंत जुने असून त्यास वन विभागाची तत्वत: मान्यता मिळाली होती. त्यानुसार निधी मंजूर झाल्यानंतर रक्कम रु.११,३६,६९४/- भरणा केलेली आहे. तथापि,

वन विभागाचे एनपीव्ही रक्कम मागणीचे पत्र व सर्वोच्च न्यायालयाचे सुधारीत आदेश तसेच केंद्रीय सशक्तता समिती, सर्वोच्च न्यायालय यांच्या पत्रानुसार वनांचे प्रवर्ग ठरविण्यात आले असून सदर वन जमिनीचा प्रती हेक्टरी दर रु.६.२६ लक्ष ठरविण्यात आला आहे. त्याप्रमाणे १३.०० हे. साठी रु.८१,३८,०००/- एवढी रक्कम वन विभागाकडे वर्ग करणेबाबत कळविण्यात आले आहे. दि.१२/०९/२०१७ रोजी सदर निधीची मागणी करण्यात आली असून निधी प्राप्त होताच वन विभागाकडे भरणा करुन त्याची रितसर मंजुरी मिळाल्यानंतर घळभरणीचे काम करण्यात येईल.

हस्तापुर (ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ) येथुन गेलेल्या बेंबळा प्रकल्पाच्या वितरीकेतुन निघालेल्या पाटस-याच्या अपूर्ण कामाबाबत

(३०) ९२३४४ (१८-०८-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हस्तापूर (ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ) येथुन गेलेल्या बेंबळा प्रकल्पाच्या वितरीकावरुन पाटस-याचे काम करण्यात आले असल्याचे दिनांक ५ जुन, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या भागातील शेतकऱ्याने दिलेल्या निवेदनावरुन पाटस-याची कामे अपूर्ण झाली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किती मिटर पर्यंत पाटस-याचे काम करण्यात आले एकुण किती खर्च आला आणि सध्या पाटस-याची परिस्थीती काय आहे,

(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार कंत्राटदारांवर व सदर कामात दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०६-०२-२०१८) : (१) हस्तापुर येथील लघुपाट व उपलघुपाट क्र. १ येथील पाटसऱ्याची कामे पुर्ण झाली आहेत. तथापी उपलघुपाट क्र.२ वरील पाटस-याची कामे सुरु झालेली नाहीत.

(२) व (३) हस्तापुर लघुपाटावरील शेतकऱ्यांची निवेदने प्राप्त झाली नाहीत.

हस्तापुर लघुपाटा वरील २.८० की.मी. व लघुपाट क्र.१ लांबी १.१ की.मी. काम पुर्ण झाले असुन त्यावर रु.१७.८९ लक्ष इतका खर्च झालेला आहे. लघुपाटावरील उपलघुपाट क्र.२ वरील पाटस-यांची कामे सुरु करण्यात आलेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

घुईखेड (ता.चांदुर रेल्वे, जि.अमरावती) या बेंबळा प्रकल्पाच्या पुनर्वसीत गावाच्या पाणी पुरवठ्याबाबत

(३१) ९२९६६ (२१-०८-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घुईखेड (ता.चांदुर रेल्वे, जि.अमरावती) या बेंबळा प्रकल्पाच्या पुनर्वसीत गावात पाणीपुरवठ्यावर कोट्यवधी रुपये बेंबळा प्रकल्प अधिकारीनी खर्च केले परंतु अद्यापही पूनर्वसीत गावात पंधरा ते अठरा दिवसानी पाणी मिळत असून सदर पाणीपुरवठा टॅन्करने केला जातो असे दिनांक ७ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निर्देशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदर प्रकल्प विभागाने घुईखेड गावात नियमीत पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०६-०२-२०१८) : (१) व (२) मे-२०१७ मध्ये पुर्नवसीत गावांचे ७५ टक्के भागात घुईखेड येथील नविन विहिरीवरील पाणी पुरवठा वितरणाव्दारे दररोज पाणी पुरवठा सुरु होता. वितरण प्रणालीचे पाईपला गावकरी छिद्रे पाडून विद्युत मोटारने पाणी घेतात. त्यामुळे शेवटचे टोकापर्यत पाणी पोहचत नाही. उर्वरित २५ टक्के गावठाणास ४ टॅकरव्दारे दररोज पाणी पुरवठा सूरू आहे. सद्यस्थितीत कायमस्वरुपी व नियमित पाणी पुरवठा योजनेचे काम महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, अमरावती मार्फत ठेवतत्वावर करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्ह्यातील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या मजुरांच्या थकीत वेतनाबाबत

(३२) ९२९६८ (१९-०८-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील वरुड व अन्य तालुक्यातील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांचे वेतन दोन महिन्यापासून मिळाले नसल्याचे दिनांक २१ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार मजुरांचे वेतन देण्यासह वेतन देण्यास विलंब लावणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल (२५-०१-२०१८) : (१) हे अंशत: खरे आहे.
(२) मग्रारोहयो अंतर्गत १०० दिवसापेक्षा जास्त काम करणा-या कुटुंबातील मजुरांची मजुरी राज्य शासनाच्या निधीतून दिली जाते. त्यानुषंगाने मग्रारोहयो अंतर्गत सन २०१६-१७ मधील १०० दिवसांवरील काम करणाऱ्या मजुरांची वेतन देयके प्रदान करण्याकरिता प्राप्त झालेल्या मागणीच्या अनुषंगाने माहे मे महिन्यात टप्प्या - टप्प्याने निधी उपलब्ध झाला होता. त्यानुसार सदर मजुरांची मजुरी प्रदान करण्यात आली असून सद्यस्थितीत पूर्णपणे वितरीत करण्यात आली आहे. १०० दिवसापर्यंत काम करणा-या कुटुंबातील मजुरांच्या वेतनाकरिता केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध करुन दिला जात असल्याने त्यासंदर्भातील प्रदाने प्रलंबित नव्हती.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

उमरखेड (जि.यवतमाळ) येथील पंचायत समितीच्या
गटविकास अधिकाऱ्यांच्या गैरकारभाराबाबत

(३३) ९३७७४ (२२-०८-२०१७). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरखेड (जि.यवतमाळ) येथील पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांच्या गैरकारभारामुळे अनेक विकास कामे बंद झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार संबधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०९-०२-२०१८) : (१) नाही, हे खरे नाही.
तथापि, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरखेड जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या कामकाजाबाबत अध्यक्ष सरपंच संघटना उमरखेड जिल्हा यवतमाळ यांनी तक्रार सादर केली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (नरेगा), जिल्हा परिषद, यवतमाळ यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.
(२) व (३) जिल्हा स्तरावर चौकशी सुरु आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

दौंड (जि.पुणे) तालुक्यातील केडगाव, दापोडी, हंडाळवाडी, कुरकुंभ, स्वामीचिंचोली, या ठिकाणचे पाणी नागरिकांना मिळण्याबाबत

(३४) ९४३१५ (२१-०८-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील केडगाव, दापोडी, हंडाळवाडी, कुरकुंभ, स्वामीचिंचोली, या ठिकाणच्या नागरिकांना पाणी मिळावे म्हणून आंदोलने करावी लागल्याची बाब दिनांक १५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार या गावांना कायमस्वरूपी पाणी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०७-०२-२०१८) : (१) होय.

दि.०६.०५.२०१७ रोजी शेतीचे पाणी मिळणेबाबत लाभधारकांनी आंदोलन केले होते.

(२) होय.

त्याबाबत विभागीय स्तरावर प्राथमिक चौकशी करून गावांना सिंचनासाठी पाणी देणेत आले आहे.

तसेच मौजे दापोडी गावास पिण्याचे पाणी वार्षिक ०.१४३ दलघमी इतके आरक्षण मंजूर आहे. तथापी सदर योजना अद्याप कार्यान्वीत नाही. उर्वरीत हंडाळवाडी कुरकुंभ, स्वामी चिंचोलीय गावात कायमस्वरूपी पिण्याचे पाणी आरक्षण मंजूर नाही. त्यामुळे सदर गावाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा संबंधीत ग्रामपंचायत / जिल्हापरिषद यांचेशी निगडीत आहे.

तथापी, वरील नमुद आंदोलनाच्या अनुषंगाने सिंचनासाठी व पिण्यासाठी उपरोक्त गावांना २०१७ च्या उन्हाळा हंगामाचे आवर्तनात पाणी सोडण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सोनार्ली वसाहत (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथे महसूल निहाय स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापण्याबाबत

(३५) ९५६६३ (२२-१२-२०१७). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वारणा धरणातील बुडीत क्षेत्रातील पुनर्वसितांचे स्थलांतर करून पुनर्वसन करण्यात आलेल्या सोनार्ली (ता.शाहूवाडी, जि,कोल्हापूर) वसाहतीतील रहिवास्यांकरीता गेली ३२ वर्ष उलटून गेली असताना देखील अद्याप महसूल निहाय स्वतंत्र ग्रामपंचायत नसल्याची बाब दिनांक ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार सदर ठिकाणी नवीन ग्रामपंचायत स्थापण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०७-०२-२०१८) : (१) व (२) वारणा धरणातील बुडीत क्षेत्रातील पुनर्वसितांचे स्थलांतर करून पुनर्वसन करण्यात आलेली सोनार्ली वसाहत ही पेठ वडगांव नगर परिषदेच्या हद्दीत येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

हातमागावर पैठणी साडी तयार करण्यासाठी लागणारे रेशीम व जरी या कच्च्या मालासह पैठणी विक्रीला जीएसटीमधून करमाफी मिळण्याबाबत

(३६) ९५७६२ (२६-१२-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हातमागावर पैठणी साडी तयार करण्यासाठी लागणारे रेशीम व जरी या कच्च्या मालासह पैठणी विक्रीला जीएसटी मधून करमाफी मिळावी याकरिता वस्तू व सेवा कर परिषदेकडे राज्यामार्फत शिफारस करण्यात येईल असे दिनांक १ ऑगष्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास आश्वासन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पैठणी उद्योग हा भारतातील अभिजात कला, हस्तकला जोपासणारा उद्योग असल्यामुळे पैठणीचे महाराष्ट्राच्या संस्कृतीशी असलेले नाते लक्षात घेवून पैठणीसाठी लागणारा कच्चा माल व पैठणीवर वस्तू व सेवा कराची आकारणी करू नये अशी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ सप्टेंबर, २०१७ व माहे आक्टोंबर, २०१७ मध्ये शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०२-२०१८) : (१) होय, खरे आहे.
(२) होय, खरे आहे.
(३) राज्य शासनाने दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ रोजी जीएसटी परिषदेस पैठणीवर कर माफ करण्याबाबत शिफारस केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मराठी पुस्तकावर निर्मितीपासून ते विक्रीपर्यंत विविध टप्प्यांवर जीएसटी लावण्यात आली असल्याने पुस्तकांचे खर्च वाढणार असल्याबाबत

(३७) ९६०११ (२९-१२-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी पुस्तकावर निर्मितीपासून ते विक्रीपर्यंत विविध टप्प्यांवर जीएसटी लावण्यात आली असल्याने पुस्तकांचे खर्च वाढणार असून प्रकाशक आर्थिक अडचणीत आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कमी होत असलेला मराठी पुस्तकांचा वाचक वर्ग टिकवून ठेवण्यासाठी व मराठी पुस्तकांच्या विक्रीस प्रोत्साहन मिळावे यासाठी शासन प्रयत्नशील आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार मराठी पुस्तकांचा वाचक वर्ग टिकवून ठेवण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०२-२०१८) : (१) हे खरे नाही. पुस्तकांवर जीएसटीपूर्व व जीएसटीनंतरही कराची आकारणी नाही. जीएसटीपूर्व पुस्तकासाठीच्या महत्वाच्या कच्च्या मालावर म्हणजेच कागदावर ६ टक्के केंद्रीय उत्पादन शुल्क व ६ टक्के विक्रीकर अशी एकंदरीत १२ टक्के कराची आकारणी होत असल्याने, पुस्तकाचा खर्च वाढणार नाही.
(२) होय.
(३) मराठी पुस्तकांचा वाचकवर्ग टिकवून ठेवण्यासाठी पुस्तकांच्या विक्रीस प्रोत्साहन देण्यासाठी दुर्मिळ ग्रंथांचे डिजिटायझेशन करून सदर पुस्तके संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.विश्वकोश व परिभाषा कोशांचे डिजिटायझेशन करून संकेतस्थळावर तसेच सी. डी. व पेनड्राईव्हच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. या विभागाच्या अधिपत्याखाली भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ या कार्यालयांकडून प्रकाशित झालेल्या व पुढे प्रकाशीत करण्यात येणाऱ्या प्रकाशनांची विक्री शासकीय मुद्रण, लेखन सामग्री व प्रकाशन संचालनालय व त्यांच्या संलग्न ग्रंथागरे आणि संचालनालयामार्फत नेमण्यात आलेल्या महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील अधिकृत विक्रेत्यांना प्रकाशनांवर सरसकट ४० टक्के सवलत देण्यात येते. त्याचप्रमाणे वाचन प्रेरणा दिन, मराठी भाषा संवर्धन पंधरवडा, मराठी भाषा गौरव दिन, शाळा/महाविद्यालयस्तर तसेच विविध शासकीय कार्यलयात साजरे करण्यात येतात त्याचे औचित्यसाधून ग्रंथप्रदर्शन भरविण्यात येतात.
(४) लागू नाही.

कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील ४७ ग्रामपंचायतींमध्ये समृध्द महाराष्ट्र जनकल्याण योजनेंतर्गत काम सुरु झालेली नसल्याबाबत

(३८) ९६७८२ (०६-०१-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील ४७ ग्रामपंचायतींमध्ये समृध्द महाराष्ट्र जनकल्याण योजनेंतर्गत एकही काम सुरु झाले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तालुक्याला देण्यात आलेले उद्दिष्ट अद्यापपर्यंत पूर्ण झाले नसल्याने याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार सदर योजनेतील विकासकामांचे उद्दिष्ट पूर्ण न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल (१२-०२-२०१८) : (१) व (२) हे खरे नाही.

कळमनुरी पंचायत समितीस सिंचन विहिर, शेततळे, शौचालय, शोषखड्डे, रोपवाटीका, नाडेप, वृक्षलागवड व ग्रामसबलीकरण इत्यादी कामचे एकुण ४७४० उद्दिष्ट प्राप्त झाले होते. त्यापैकी १०७८ कामांना प्रशासकीय मान्यता दिलेली असून १८७ कामे सर्व ग्राम पंचायतीमध्ये आज रोजी सुरु झालेली आहेत. कळमनुरी तालुक्यातील सर्व १२५ ग्रामपंचायतीमध्ये शुन्य खर्चाची एकही ग्रामपंचायत शिल्लक नाही.
(३) व (४) सर्व ग्रामपंचायतीमध्ये मोठ्या प्रमाणात सेल्फवर कामे उपलब्ध असून मजुंराच्या मागणीनुसार कामे तात्काळ उपलब्ध करून देण्यात येतात त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात मुंबई, पुणे व नागपूर येथे महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणाची खंडपीठे स्थापन करण्याबाबत

(३९) ९७०८१ (२६-१२-२०१७). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिर) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मुंबई, पुणे व नागपूर येथे महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणाची खंडपीठे स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई येथील विक्रीकर विभागाच्या मुख्यालयात विक्रीकर न्यायाधिकरणाची ५ खंडपीठे कार्यरत असतांना नवीन खंडपीठे स्थापन करण्याची कारणे काय आहेत व यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, नवीन खंडपीठे स्थापन करण्यासह निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०१-२०१८) : (१) होय.
(२) विक्रीकर न्यायाधीकरणाची मुख्यालयातील ५ खंडपीठे मुंबई व लगतच्या भागातील व्यापाऱ्यांसाठी सोयीची असली तरी नागपूर, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा या भागातील

व्यापाऱ्यांसाठी सोयीची ठरत नव्हती. विक्रीकर विभागाकडील अपील प्रकरणात गुंतलेला महसूल वसुलीसाठी उपलब्ध होण्याकरीता अपील प्रकरणांचा जलद गतीने निपटारा होण्यासाठी ३ नवीन खंडपीठे स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठीचा खर्च मंजूर अनुदानातून भागविण्यात येणार आहे.

(३) नवीन खंडपीठे कार्यान्वित होण्यासाठी विक्रीकर विभागाच्या मुंबई, पुणे व नागपूर येथील इमारतीमध्ये जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. नवीन खंडपीठासाठी न्यायिक सदस्य व विभागीय सदस्यांची नियुक्ती करण्यात येत आहे. आवश्यक पद निर्मितीचा प्रस्ताव उच्च स्तरीय सचिव समितीकडे सादर करण्यात आला आहे. दरम्यान सदर पदे मंजूर होईपर्यंत अन्य अधिकारी/कर्मचारी यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपवून मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुळशी तालुक्यातील (जि.पुणे) भोडे व वातुंडे या गावांच्या दरम्यान असलेला पूल वाहतुकीस धोकादायक असल्याबाबत

(४०) ९७८७४ (२२-१२-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोडे व वातुंडे (ता.मुळशी, जि.पुणे) या गावांच्या दरम्यान असलेल्या पुलाचे एका बाजूचे संरक्षक कठडे तुटले असल्यामुळे हा पूल वाहतुकीस धोकादायक बनला असल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भोडे गावामध्ये देवीचे मंदिर असल्यामुळे या पूलावर भाविकांची वर्दळ असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पुलाची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार येथे संभाव्य अपघात होऊ नयेत यासाठी या पूलाच्या संरक्षक कठडयांचे काम तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०८-०२-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) विशेष दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत पुलाच्या संरक्षण कठडयाची दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मेहकर (जि.बुलढाणा) शहरातील १३ वस्त्यांच्या भागाचा विकास करण्यासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबत

(४१) ९८२३४ (२२-१२-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) शहरातील १३ वस्त्यांचा भाग नगरपरिषद हद्दी क्षेत्राबाहेर राहिल्याने विकासापासून वंचित राहत असल्याने स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करावी अशी मागणी ग्रामविकास विभागाकडे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लोकप्रतिनिधीनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार उक्त ठिकाणी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०९-०२-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

(२) मेहकर नगर परिषदे हद्दीच्या बाहेर असलेल्या त्रिशंकू भागासाठी जिल्हाधिकारी, बुलडाणा यांनी दि. २६ डिसेंबर, २०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये घोषित केलेल्या "मेहकर ग्रामीण" या महसूली गावासाठी स्वतंत्र ग्रामंपचायत स्थापन करणेसाठीचा प्रस्ताव गट विकास अधिकारी, पंचायत समिती मेहकर यांनी दि. ०३ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा परिषद, बुलडाणा यांच्याकडे सादर केला असून शासन निर्णय दि. १२ फेब्रुवारी, २००४ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील वस्तू सेवा कर(जि.एस.टी) कायद्यातील जाचक अटी शिथिल करण्याबाबत

(४२) ९८२८७ (०६-०१-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ जुलै २०१७ रोजी जीएसटी लागू झाल्यापासून, माहे ऑक्टोबर २०१७ अखरेपर्यंत तीन महिन्यात, महसूल करामध्ये १२ ते १५ टक्क्याची वाढ अपेक्षित असताना, राज्याच्या तिजोरीत जेमतेम ११ हजार कोटी रुपये जमा झाले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील वस्तू सेवा कर (जी.एस.टी) कायद्यातील जाचक अटी लादल्यामुळे व्यापाऱ्यांना नाहक त्रास होऊन त्यांना आर्थिक व मानसिक नुकसान होऊन मंदीचा सामना करावा लागत असल्यामुळे या (जि.एस.टी) कायद्यातील जाचक अटी शिथिल करून यामध्ये फेरबदल करण्यासाठी मा. मंत्री वित्त व नियोजन यांना लोकप्रतिनिधी पंढरपूर यांनी पत्राद्वारे विनंती केली असल्याचे दिनांक १५ जून,२०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घाऊक व्यापाऱ्यांना महिन्याला तर किरकोळ व्यापाऱ्यांना तीन महिन्यात विवरणपत्र भरण्याची मुदत दिली असून या दोन्ही व्यापाऱ्याचा एकमेकांशी सबंध असल्याने विवरणपत्र भरणेबाबत संभ्रम निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जीएसटीच्या माध्यमातून अधिकाअधिक महसूल जमा करण्याकरीता अधिकाधिक घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांकडून नियमित वेळेत विवरणपत्रे भरण्यासह या राज्यातील वस्तू सेवा कर (जि.एस.टी) कायद्यातील जाचक अटी शिथिल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०२-२०१८) : (१) हे खरे नाही. माहे ऑक्टोबर २०१७ अखेर पर्यंत तीन महिन्यात जीएसटी अंतर्गत रु.१८०५६ कोटी जमा झाले आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही. रु.१.५ कोटीपेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांच्या सोईकरीता विवरणपत्राचा कालावधी त्रैमासिक करण्यात आला आहे. मोठ्या व्यापाऱ्यांचा कालावधी मासिक असला तरी सरळ व सोपे विवरणपत्र असल्याने विवरणपत्र भरण्याबाबत संभ्रम निर्माण झालेला नाही.
(४) सर्व व्यापाऱ्यांना नवीन कार्यपद्धतीबाबतची माहिती घेऊन तपशीलवार विवरण भरण्याकरीता मुदतवाढ देण्यात आली आहे.
(५) लागू नाही.

राज्यातील प्रत्येक जिल्हापरिषदेत प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतील कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेण्याबाबत

(४३) ९८९१२ (२२-१२-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रत्येक जिल्हापरिषदेत प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतील मागील १० वर्षापासून कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना शासन सेवेत नियमित आस्थापनावर सामावून घेण्यासाठी तसेच त्यांचे वेतन वाढीसाठी लोकप्रतिनिधी व कर्मचारी यांनी संबंधिताकडे वारंवार मागणी करण्यात येऊनही अद्यापी याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०९-०२-२०१८) : (१) प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेसाठी महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेअंतर्गत निर्माण करण्यात आलेल्या पदांपैकी कंत्राटी तत्वावर भरण्यात

आलेल्या कर्मचाऱ्यांनी शासकीय सेवेत कायम करण्यासाठी हायकोर्ट, मुंबई तसेच खंडपीठ औरंगाबाद व नागपूर येथे याचिका दाखल केल्या असून सद्यःस्थितीत सदर याचिका न्यायप्रविष्ट आहेत. तसेच सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या ठोक मानधनामध्ये वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

शेतकऱ्यांच्या शेतीसाठी लागणाऱ्या औजाराला सेवा करामधून सूट मिळण्याबाबत

(४४) ९९६८४ (२६-१२-२०१७). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ट्रॅक्टरच्या काही सुट्या भागांवर २८ टक्के वस्तू व सेवा कर (जीएसटी) लावण्याचे केंद्र शासनाने जाहीर केलेले आहे तसेच राज्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीच्या व्यवसायासाठी लागणारे शेती औजारे खरेदी करताना यामध्ये केंद्र व राज्यांचा असा दोन्ही मिळून अतिरिक्त सेवाकर लावला जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ट्रॅक्टरच्या निर्मिती खर्चात २५ हजारांची वाढ होऊन त्याचा अप्रत्यक्ष फटका कृषी क्षेत्राला मुख्यतः खरेदीदार शेतकऱ्यांना बसणार असल्याने ट्रॅक्टरच्या सर्व सुट्या भागांवर १८ टक्केच जीएसटी लावण्यात यावा अशी मागणी ट्रॅक्टर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने (टिएमए) केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,शेतकऱ्यांच्या शेतीसाठी लागणाऱ्या औजाराला सेवा करामधून सूट मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०२-२०१८) : (१) हे खरे नाही. दिनांक १८ ऑगस्ट २०१७ रोजी केंद्र शासनाने व राज्य शासनाने अधिसूचना निर्गमित केली आहे. अधिसूचनेद्वारे ट्रॅक्टरच्या सुट्या भागावर एकत्रित १८% दराने आकारणी होईल.
(२) होय.
(३) केंद्र शासनाने व राज्य शासनाने दिनांक १८ ऑगस्ट, २०१७ रोजी अधिसूचना निर्गमित करुन ट्रॅक्टरच्या सुट्या भागावरील एकत्रित कराचा दर १८% केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

न मागितलेला लाभांग (अन्क्लेम्ड) बक्षिसांच्या रकमेचा विनियोग करण्याबाबत

(४५) १००००३ (२६-१२-२०१७). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या दिनांक १ एप्रिल, २०१६ ते ३१ ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत बक्षिसांसाठी पुढे न आलेल्या भाग्यवान तिकिटांची संख्या व बक्षिसाची एकूण रक्कम किती आहे तसेच यापैकी किती रुपयांची बक्षिसे मुदतबाह्य होऊन कोषागारात (ट्रेझरीत) जमा झाली आहे,

(२) तसेच माहे एप्रिल, २०१७ ते जुलै, २०१७ या कालावधीत खर्च वजा जाता किती रुपये निव्वळ उत्पन्न मिळाले,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य लॉटरीपासून मिळणारे उत्पन्न दिवसेंदिवस कमी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागितलेला लाभांग (अन्क्लेम्ड) बक्षिसांच्या रक्कमेचा विनियोग करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०१-२०१८) : (१) महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या दि. ०१ एप्रिल, २०१६ ते ३१ ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत बक्षिसांसाठी पुढे न आलेल्या भाग्यवान तिकीटांची संख्या ३१६१०० इतकी आहे. बक्षिसांची रक्कम रू. ५,४९,९५,२६३/- इतकी आहे. सदरची न मागितलेली लाभांग (अनक्लेम्ड) रक्कम शासन जमा करण्यात आली आहे.

(२) माहे एप्रिल, २०१७ ते जुलै, २०१७ या कालावधीत खर्च वजा जाता रू. २,४४,२६,६९३/- इतके निव्वळ उत्पन्न मिळालेले आहे.

(३) अशी परीस्थिती नाही.

(४) न मागितलेला लाभांग (अनक्लेम्ड) रक्कम शासन जमा करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

ग्रामपंचायत सालईदाभा (जि.नागपुर) अंतर्गत येणाऱ्या
कारखान्यावरील कर वसुली करण्याबाबत

(४६) १०११७२ (२६-१२-२०१७). श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत सालईदाभा (जि.नागपुर) अंतर्गत येणाऱ्या कारखान्यावरील कर वसुली करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. नागपुर यांना दिनांक २२ सप्टेंबर,२०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,औद्योगीक वसाहत बुटीबोरी येथे ग्रामपंचायत सालईदाभा क्षेत्रात ८० पेक्षा जास्त कारखाने उभारण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कारखान्यावर शासनाने कर वसुलीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०९-०२-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, ग्रामपंचायत सालईदाभा यांनी सर्वेक्षण केल्यानुसार त्यांच्या क्षेत्रात ८० कारखाने उभारल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) व (४) ग्रामपंचायत सालईदाभा यांनी त्यांच्या क्षेत्रातील ८० कारखान्यांपैकी ३६ कारखान्यांना कर आकारणी केली आहे. या ३६ कारखान्यांपैकी १४ कारखान्यांनी कराचा भरणा केला असून २२ कारखान्यांना कराचा भरणा करण्याबाबत मागणी लेख तामील करण्यात आले आहे. उर्वरित ४४ कारखान्यांवर कर आकारणीची कार्यवाही सुरू आहे.

उर्वरित ४४ कारखान्यांवर अद्यापही कर आकारणी न केल्याबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिंगणा, संबंधित विस्तार अधिकारी (पंचायत), सरपंच व ग्रामसेवक, ग्रामपंचायत सालईदाभा यांना कारणे दाखवा नोटिस देण्यात आली आहे.

पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील खडेखोळ ते भाचरवाडी रस्त्याची झालेली दुरवस्था

(४७) १०१३२४ (२६-१२-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडेखोळ ते भाचरवाडी (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) हा रस्ता तालुक्यातील पश्चिम भागातील लोकांना पन्हाळा गडाकडे ये-जा करण्यासाठी महत्वाचा रस्ता असुन रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय व पाहणीत काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार खडेखोळ ते भाचरवाडी रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०८-०२-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) प्रधानमंत्री ग्राम सडक योजनांतर्गत क्षेत्रिय देखभाल दुरुस्ती कार्यक्रम सन २०१६-२०१७ मधून सदर रस्त्याच्या साखळी क्र. ०/०० ते ४/१८५ कि.मी. लांबीतील देखभाल दुरुस्तीचे काम मंजूर आहे. त्यापैकी साखळी क्र. ०/०० ते २/०० कि.मी. लांबीतील रस्ते दुरुस्तीचे काम पुर्ण करण्यात आले असून उर्वरीत साखळी क्र. २/०० ते ४/१८५ कि.मी. लांबीतील देखभाल दुरुस्तीचे काम मार्च २०१८ पर्यत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणातून ६५ टीएमसी पाणी वाहून गेल्याबाबत

(४८) १०१८४४ (२६-१२-२०१७). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दरवर्षी पावसाळा संपल्यानंतर १ ऑक्टोबर रोजी धरणाचे दरवाजे बंद करण्यात येतात मात्र यंदा ऑक्टोबर संपूनही सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणाचे दरवाजे बंद करण्यात न आल्याने धरण परिसरात पाण्याचा विसर्ग सुरु असल्याने सुमारे ६५ टीएमसी पाणी वाहून गेल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने याकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (३१-०१-२०१८) : (१) हे खरे नाही.

उजनी धरणामध्ये १५ ऑक्टोंबर, २०१७ रोजी १००% उपयुक्त पाणीसाठा झाला होता. उजनी धरणाच्या मंजूर ROS नुसार, धरणामध्ये पाणीसाठा करण्यास असलेल्या मर्यादा व धरण सुरक्षा सर्व बाबींचा विचार करुन पूर नियंत्रणासाठी उजनी धरणातून दि. २९/८/२०१७ ते २९/१०/२०१७ या कालावधीमध्ये एकूण ६८.५४ टीएमसी पाणी भीमा नदीत सोडण्यात आले होते.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यातील ११४ सिंचन प्रकल्प पुर्ण करण्याच्या प्रस्तावाबाबत

(४९) १०१८६५ (०२-०१-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यातील ११४ सिंचन प्रकल्प पुर्ण करण्यासाठी राज्य शासनाने व राज्यपाल यांनी रुपये ७१.८० कोटीची आर्थिक मदत मिळावी अशी मागणी करणारा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने अपुरे सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी मंजूर केला आहे काय वा आतापर्यंत त्यापैकी किती निधी दिला आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (३१-०१-२०१८) : (१) विदर्भ व मराठवाड्यातील १२ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील आणि उर्वरित महाराष्ट्रातील ६ अवर्षणप्रवण जिल्ह्यातील ११२ प्रकल्प / प्रकल्प घटक पूर्ण करण्याकरिता सुमारे रु.१४,२०० कोटी रकमेचा प्रस्ताव राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला आहे.

(२) सदर प्रस्ताव केंद्र शासनाच्या विचाराधीन असून मान्यतेनंतर निधी प्राप्त होणे अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

हिवताप व हत्तीरोग विभागातील प्रयोगशाळा वैद्यानिक अधिकारी (प्रयोग शाळा तंत्रज्ञ) या संवर्गावर सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजना कालबद्ध १२ व २४ वर्ष तसेच पद शृंखलेमध्ये होणारी तफावत दूर करण्याबाबत

(५०) १०२१२४ (०६-०१-२०१८). श्री.रवि राणा (बडनेरा) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील हिवताप व हत्तीरोग विभागातील प्रयोगशाळा वैद्यानिक अधिकारी (प्र. शा. त) या सवर्गावर सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना कालबद्ध पदोन्नती १२ ते २४ वर्ष तसेच पदशृखंलेमध्ये होणारी तफावत दूर करण्याबाबत सा.आ.वि मंत्रालय व सामान्य प्रशासन मंत्रालय या विभागाने प्रस्ताव क्र. PHD/४०१४/१७/२०१४/PHD-सेवा-५ या प्रस्तावास मान्यता दिलेली असून या प्रस्तावास वित्त विभाग मंत्रालयाने मान्यता देऊन प्रस्ताव मंजूर करण्यासाठी मा. वित्त मंत्री यांनी त्यांचे पत्र क्र. २६२६१७८ दि. ११/१०/२०१७ रोजी अप्पर मुख्य सचिव (वित्त) याना प्रस्ताव मंजूर करण्याचे आदेश निर्गमित झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासन निर्णय आदेश निर्गमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०२-२०१८) : (१) होय, सदर प्रस्ताव सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अथवा कालबध्द पदोन्नती बाबतचा नसून आरोग्य पर्यवेक्षक व अवैद्यकीय आरोग्य अधिकारी (एडीएमओ) हे दोन संवर्ग एकत्रित करुन सहाय्यक तांत्रिक अधिकारी हा नवीन संवर्ग निर्माण करण्याबाबतचा आहे. या नवीन संवर्गास मूळ दोन संवर्गापेक्षा उच्च ग्रेड वेतन प्रस्तावित केले आहे. सदर प्रस्ताव प्राप्त झाला असता या प्रस्तावाबाबत सातव्या वेतन आयोगाच्या समितीसमोर विभागाने उचित प्रस्ताव सादर करावा, सद्यस्थितीत कोणत्याही मार्गाने वेतनवृध्दी करणे योग्य होणार नाही, असा निर्णय, शासन मान्यतेने यापूर्वी घेण्यात आला आहे. तसेच केंद्रीय ७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या वेतन सुधारणे संदर्भात शिफारसी करण्यासाठी राज्य वेतन सुधारणा समिती,

२०१७ नियुक्त केल्यामुळे सद्य:स्थितीत श्रेणीवाढीचे प्रस्ताव विचारात न घेण्याचा धोरणात्मक निर्णय शासन परिपत्रक, वित्त विभाग, दि. १४ ऑगस्ट, २०१७ अन्वये घेण्यात आला आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी वरील निर्णयांनुसार प्रशासकीय विभागाकडून कार्यवाही अपेक्षित आहे. (२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.